
मोहंमद, हाशिम आणि माकड

ईव्ह बंटिंग

चित्रे व सजावट: लिन मुनसिंगर

अनुवाद: सुजाता गोडबोले



मोहंमद, हाशिम आणि माकड

ईव्ह बंटिंग

चित्रे व सजावट: लिन मुनसिंगर

अनुवाद: सुजाता गोडबोले







तायोंग कलापा या गावात मोहंमद आणि हाशिम या दोघांची घरे नारळीच्या बागांच्या भागात शेजारी शेजारी होती. एके काळी मोहंमद आणि हाशिम यांची चांगली मैत्री होती. पण आता त्यांची मैत्री नव्हती. मोहंमदने एक माकड आणि हाशीमने एक सायकल आणल्यापासून त्यांची मैत्री तुटली होती.



रोज सकाळी मोहंमद माकडाला एक दोरी बांधून आपल्या बरोबर घेऊन घरातून लवकर बाहेर पडायचा. माकडाला चालायला आवडत नसे, मग ते मध्येच थांबायचे. मग त्याला एखादे केळे, नाहीतर मूठभर शेंगदाणे देऊन मोहंमद त्याला कसाबसा परत चालायला लावत असे.

हाशिम मात्र त्यांच्याजवळून आपल्या सायकलवरून ऐटीत जात असे.

"अरेरे! तू किती सावकाश चालला आहेस! तू बागेत पोचेपर्यंत माझे तर नारळ काढूनही होतील," तो मोहंमदला चिडवायचा.


मोहंमद त्याला उत्तर द्यायचा, "आणि सगळं काम तर तुलाच करावं लागेल ना! अरे वेड्या, माझं हुशार माकड सगळं काम करेल!"

यावर हुशार माकड काहीच बोलत नसे.



ते जेव्हा बागेत पोचायचे तेव्हा हाशिम केव्हाच झाडावर उंच चढलेला असायचा. मग मोहंमद त्याच्या माकडाला झाडावर चढून नारळ काढायला सांगायचा.

“अरे, इथून तर हाशिम कोणता आणि माकड कोणते हे समजतच नाही!” तो ओरडून म्हणायचा. पण माकड अर्थातच जास्त नारळ काढते.”




दिवस संपत आला की मोहंमद सगळे नारळ त्याच्या काठीला बांधलेल्या झोळीत ठेवायचा आणि तो आणि त्याचे माकड संथपणे घराकडे चालू लागायचे. थोड्याच वेळात त्यांना सायकलीच्या चाकांचा आवाज ऐकू यायचा आणि मोहंमद माकडाला बांधलेल्या दोरीला एक झटका द्यायचा.

“आता जर खाली बसलास तर बघ! आणि हो, मागे बघू नकोस!”

माकड ते कधीच ऐकत नसे.

आपल्या सायकलीला लावलेले नारळ घेऊन हाशिम निघाला की या दोघांना बाजूला उभे राहून त्याला रस्ता मोकळा करून द्यावा लागे.

“तुला तुझ्या माकडाच्या पाठीवर बसून जाता येत नाही, हे फार वाईट आहे रे!” हाशिम जाता जाता टोमणा मारायचा.






मोहंमदही काही कमी नव्हता. तो म्हणायचा, “दिवसभर आरामात झाडाखाली बसून इतर लोक कसे काम करतात हे पाहणाऱ्या माणसाला नारळ खांद्यावरून नेण्याचे काहीच वाटत नाही.” मग हाशिम पुढे निघून गेला की मोहंमद नारळाचे ओझे आपल्या दुखऱ्या खांद्यावरून दुसऱ्या खांद्यावर घ्यायचा. “दुष्ट कुठला! त्याच्या सायकलीला गंज चढू दे आणि ती मोडून जाऊ दे!” तो आपल्याशीच पुटपुटायचा.

माकड यावर काहीच बोलायचे नाही.

घरी आल्यावर मोहंमद माकडाला एक लांबच्या लांब दोरी बांधायचा आणि माकड आपल्या झाडावरच्या घरात जाऊन बसायचे. त्याची मुलगी फातिमा माकडाला खायला केळी आणि पेरू आणून द्यायची आणि त्याची बाकीची मुले त्याला नारळ सोलायला मदत करायची.

शेजारचा हाशिम यावेळी आपले काम संपवून आरामात पहुडलेला असायचा.






एक दिवस सकाळच्या वेळी हाशिम आणि माकड झाडावर चढलेले असताना मोहंमदला विव्हळण्याचा आवाज ऐकू आला.

“माकडा, तुला रे काय झालं?” मोहंमदने विचारले.

माकडाने काहीच उत्तर दिले नाही.





डोळ्यावर येणारी सूर्याची किरणे चुकवत, मोहंमदने दोरी ओढली, “माकडा, खाली उतर!”

माकडाने आपले हात झाडाभोवती घट्ट धरले आणि ते आणखीच जोरात विव्हळू लागले. मग मोहंमदला झाडावर चढून त्याला खाली उतरायला मदत करावी लागली.

माकड जमिनीवर लोळू लागले.






“तुला बरं वाटत नाही का?” मोहंमदने विचारले.

माकडाने आपले डोके झाडावर आपटले. मोहंमदने त्याला धरून उभे केले.

त्याच्यावर एक सावली पडली.

“हे माकड तर आजारी दिसते,” हाशिम म्हणाला, “त्याला शहरातल्या माकडाच्या डॉक्टरकडे न्यायला हवे.”

मोहंमदने माकडाला उचलून घेतले पण ते चांगलेच जड होते. “या माकडाला काही आता चालता येत नाही, आणि त्याला उचलून न्यायचे तर ते फार जड आहे. आता त्याला शहरात न्यायचे तरी कसे?”



“हे एक शहाणे माकड आहे. मी तुला आणि त्याला माझ्या सायकलीवरून शहरात नेईन. माझा काही माकडावर राग नाही, राग आहे तो त्याच्या मालकावर.”

मोहंमदने थोडा विचार केला. “माझ्यासाठी मी तुझी मदत कधीच घेणार नाही. पण माकडाच्या वतीने मात्र मी तुझ्या मदतीचा स्वीकार करतो.”

मोहंमद सायकलच्या दांडीवर बसला आणि माकड त्याच्या मांडीवर बसले. हाशिम जोरात पाय मारू लागला आणि लवकरच ते शहरात पोचले.






हाशिम शहरातल्या रस्त्यावरच्या मोटारी, बस, बैलगाड्या यांच्या गर्दीतून वाट काढत जात होता. नागमंदिर, सुलतानाची विहीर आणि फुलबाजार ओलांडून ते माकडाच्या डॉक्टरांच्या दवाखान्यात पोचले. “चल, मी तुला माकडाला आत न्यायला मदत करतो,” हाशिम मोहंमदला म्हणाला.

मोहंमद ओशाळून खाली पाहत होता. “माकड तुझे खूप आभारी आहे.”

माकडाने आपले दात विचकले.







डॉक्टरांनी माकडाच्या कानातून एक शेंगदाणा बाहेर काढला तेव्हा त्याने परत एकदा दात विचकले.

“मला वाटत होते की तू एक शहाणे माकड आहेस!” मोहंमद माकडाला रागावला. “शेंगदाणे खायचे असतात, कानात नसतात घालायचे.”

माकडाने आपले डोके खाजवले आणि शेंगदाणा खाऊन टाकला.

मोहंमद खूष झाला.

“तुझं माकड आता ठीक झालं हे बरंच आहे. आता आपण परत जाऊया,” हाशिम म्हणाला.

ते दवाखान्यातून बाहेर आले.



“अरे! तुझी सायकल कुठे गेली?” मोहंमदने विचारले.

“अरे बापरे! कोणीतरी चोरून नेलेली दिसते! हे सगळं तुझ्यामुळे आणि तुझ्या माकडामुळे झालं आहे.” हाशिम म्हणाला.





मोहंमदने डोळे वटारले. “माकडा, चल आता. तू बरा झाला आहेस आणि तुला चालताही येतं आहे.” त्याने माकडाचा हात धरला आणि चालायला सुरुवात केली. हाशिम त्यांच्यामागे चालू लागला.


माकडाला चालायला मुळीच आवडत नव्हते. थोड्याच वेळात ते खाली बसले.

“हा! हा!” हाशिम म्हणाला.

“काय आळशी माकड आहे हे! उठ!” मोहंमद माकडावर ओरडला.

माकडाला “उठ!” हा शब्द चांगला माहित होता. आणि त्याच्यासाठी त्या शब्दाचा अर्थ होता “चढ”. माकडाने लगेच दिव्याच्या खांबावर उडी मारली.

आजूबाजूचे लोक ते पाहायला जमले.







“अरे वेड्या, खाली उतर!” मोहंमद ओरडला आणि माकड खांबावरून घसरत खाली आले.

जमलेल्या लोकांनी टाळ्या वाजवल्या आणि माकडाकडे पैसे फेकले, त्यांचा आवाज देवळातल्या घंटेसारखा मधुर होता.



मोहंमदने आपली हनुवटी खाजवली. या वेड्या माकडाला लोक पैसे काय देतात! पैसे गोळा करायला तो खाली वाकला पण माकड त्याच्यापेक्षा चपळ होते. त्याने ते सगळे पैसे गोळा केले आणि हशिमच्या पायाशी नेऊन ठेवले.





आपल्या पायानेच हाशीमने ते मोहंमदकडे सरकवले. पण माकडाने परत एक उडी मारली आणि आणि ते पैसे परत हाशिमकडे आणले.

मोहंमद म्हणाला, “त्याचे म्हणणे आहे की तूच ते घ्यावेस.”

“मी काही ते घेणार नाही. तुझ्या माकडाने ते मिळवले आहेत.” हाशीमने उत्तर दिले.

“तुझी सायकल चोरीला जाण्याने तुझे जे नुकसान झाले आहे, त्यापुढे हे पैसे काही फार नाहीत.” मोहंमद म्हणाला.

“आपण जाता जाता याबद्दल बोलूया,” हाशीमने सुचवले आणि ते घराकडे चालू लागले.

चालायला आवडत नसल्याने माकड परत खाली बसले. मग मोहंमद आणि हाशीमने एकमेकांचे हात धरून माकडासाठी एक पाळणा तयार केला.



"खरंच, कुठलंही काम दोघांनी मिळून केलं तर ते हलकं होतं, नाही का?" मोहंमद हळूच म्हणाला. "हाशिम, तुला आठवतं का, पूर्वी आपण खूप कामे दोघे मिळून करत असू."

"हो ते किती सोपं होत असे." हाशिम म्हणाला.

माकड आलटून पालटून दोघांकडे पाहू लागले आणि त्याने आपले दात विचकले.

अखेर मोहंमद म्हणाला, "मला वाटतं की मी जर तुझ्याबरोबर माकडाला घेऊन नारळ काढायचे काम केले तर आपण दोघांऐवजी तिघे असू. मग आपल्याला खूप नारळ विकता येतील. लवकरच आपल्याला परत एक सायकल विकत घेण्याइतके पैसे मिळतील. आणि आपण पूर्वीसारखे मित्र म्हणून मजेत राहू."

त्यांनी माकडाला खाली ठेवले आणि आनंदाने हातमिळवणी केली.

मग दोघांनीही माकडाशी हस्तांदोलन केले.





लवकरच त्यांना सायकल विकत घेता आली आणि ते मजेत राहू लागले.

पण आताची परिस्थिती पूर्वीपेक्षा अधिक चांगली झाली होती.



समाप्त